# प्रात्यक्षिक क्रमांक –०४

## शिवणी

तुकडे एकमेकांना जोडून कपडे शिवतात हे कपड्यांतील जोड म्हणजेच शिवणी. दोन किंवा जास्त कापडाचे तुकडे किंवा कापडाचे भाग जोडणारी शिलाईची रेष म्हणजे शिवण. चांगल्या शिवणीत पुढील वैशिष्ट्ये असावीत.

१) शिवण मजबूत व सुस्थितीत असावी.


२) शिवण नीटनेटकी असावी.

३) शिवण जाड असू नये.

शिवणी वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. त्यापैकी काही महत्वाच्या शिवणी पुढीलप्रमाणे :

१) **साधी शिवण (Plain or simple seam)** ही शिवण शिवताना कापडाचे दोन तुकडे, त्यांच्या सुलट बाजू एकमेकांवर येतील व उलट बाजू बाहेर येतील या पद्धतीने ठेवतात. दोन्ही तुकड्यांच्या कडा तंतोतंत जुळवतात. ०.५ सेमी किंवा १.० सेमी शिवणमाया सोडून टीप घालतात. कापडाच्या कडा नागमोडी कात्रीने कापतात किंवा ओव्हरकास्टींग करतात. ही शिवण कपडे तयार करताना मोठ्या प्रमाणात वापरली जाते.

२) **फ्रेंच शिवण (French seam)** ही शिवण शिवतांना कापडाचे दोन तुकडे प्रथम त्यांच्या उलट बाजू एकमेकांवर येतील व सुलट बाजू बाहेर येतील या पद्धतीने ठेवतात. ०.५ सेमी शिवणमाया सोडून साधी शिवण घालतात. नंतर कड थोडी कापून कापड शिवण रेषेवर उलटून घेतात. त्यामुळे आता कापडाच्या सुलट बाजू एकमेकांवर व उलट बाजू बाहेर येतील. कडेपासून १.० सेमी शिवणमाया सोडून दुसरी शिवण घालतात. त्यामुळे पहिली शिवण आत जाते व दिसत नाही. या शिवणीचा उपयोग लहान मुलांचे कपडे, साडी ब्लाऊज किंवा वायल, ऑरगंडी यांसारख्या तलम कपड्यांसाठी करतात. (आकृती ४.१)




आकृती ४.१ फ्रेंच शिवण

❊ ❊ ❊